Telephone No. 0712-2701580 / 2700256 / 2744671 FAX No. 0712-2744489.

GOVT. MEDICAL COLLEGE, NAGPUR.

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपुर.

बैचलर ऑफ सायन्स इन पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी (बीएस्सी-पीएमटी) अभ्यासक्रम २०२६-२०२७ साठी जाहिरात.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर येथील **बीएस्सी-पीएमटी** पदवी अभ्यासक्रमासाठी अर्ज मागविण्यात येत आहे

अभ्यासक्रमाचा कालावधी :- तीन वर्ष.अभ्यासक्रम + एक वर्ष आंतरवासीता

शैक्षणिक पात्रता : १) उम्मेद्वार हा भारतीय नागरीक असावा २) महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. ३) उम्मेद्वाराचा जन्म दि. ३१/१२/२००९ पुर्वी झालेला असावा. ४) उम्मेद्वाराने १० वी व १२ वी इयत्ता महाराष्ट्र राज्यातील संस्थामधून उत्तीर्ण करणे अनिवार्य आहे. ५) उम्मेद्वाराने इयत्ता बारावी (विज्ञान शाखा) ही भौतिक शास्त्र, रसायन शास्त्र व जीवशास्त्र या विषयातून उत्तीर्ण झालेला असावा, असे विद्यार्थी सदर अभ्यासक्रमास प्रवेशासाठी ग्राहय धरण्यात येतील.इतर विषयात विज्ञान शाखा उत्तीर्ण झालेले असल्यास उदा. मेडीकल लॅब टेक्नीशियन-१,२,३ हे विषय घेऊन उत्तीर्ण झाले असल्यास असे विद्यार्थी त्यांचे विषयासंबंधी बी. एस्सी.इन पॅरेमेडीकल टेकॉनॉलॉजी अभ्यासक्रमास पात्र राहतील.

अर्जासोबत सादर करावयाची प्रमाणपत्रे (साक्षांकित छायाप्रती) :

अ) भारतीय नागरीकत्व प्रमाणपत्र. ब) महाराष्ट्र राज्याचा अधिवासी प्रमाणपत्र क) इयत्ता १०वी उत्तीर्ण प्रमाणपत्र (जन्म तारखेकरीता). ड) इयत्ता १२वी गुणपत्रिका इ) वैद्यकीय प्रमाणपत्र (एमएच-सीईटी च्या माहितीपुस्तिकेनुसार) ई) १२वी चे प्रयत्न प्रमाणपत्र (***Attempt Cert.***) उ) आरक्षणासंबंधी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे जसे : जात व जात वैधता प्रमाणपत्र व नॉन-क्रिमिलेयर सर्टिफिकेट (*VJ, NT-1, NT-2, NT-3, OBC & SBC*)३१ मार्च, २०२७ पर्यंत वैध असलेले, तसेच ***EWS*** चे प्रमाणपत्र तसेच इतर आरक्षणाकरीता आवश्यक प्रमाणपत्र

बीएस्सी- पीएमटी अभ्यासक्रम हा खालील विषयांमध्ये उपलब्ध आहे.
कोड नं.१.रेडिओग्राफी कोड नं.२. रेडिओथॅरापी कोड नं.३. ऑपरेशन थिएटर
कोड नं.४.लेबॉरेटरी कोड नं.५.फॉरेन्सिक साईन्सेस कोड नं.६.परफयुजनिस्ट कोड नं.७.कार्डिओलॉजी
कोड नं.८.ऑप्टोमेट्री कोड नं.९.एन्डोस्कोपी कोड नं.१०.ब्लड ट्रान्सफयूजन
कोड नं.११.कम्यूनिटी मेडिसीन कोड नं. १२.इमरजन्सी मेडिकल सर्व्हीसेस.

बीएस्सी-पीएमटी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

विवरण	वेळापत्रक
विद्यार्थ्यांनी व्यक्तीशः (विद्यार्थी/पालक) या महाविद्यालयात अर्ज भरण्याचा दिनांक (सरकारी सुटट्या सोडून)	०९/११/२६ ते १८/११ /२०२६ सकाळी ११.०० ते सायं. ४.३०
अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची प्रोविजनल गुणवत्ता यादी महाविद्यालयाच्या वेबसाईट व नोटीस बोर्ड वर प्रकाशित करण्याचा दि.	२३/११ /२०२६
प्रोव्हिजनल गुणवत्ता यादी वरील आक्षेप स्विकारण	२३/११/२०२६ वेळ ४.०० पर्यंत
अंतिम गुणवत्ता यादी	२५/११/२०२६
प्रथम निवड यादी प्रसीध्दी महाविद्यालयाच्या वेबसाईट व नोटीस बोर्ड वर	२५/११/२०२६
प्रवेश घेण्याची अंतिम तारीख मुळ प्रमाणपत्रे व आवश्यक शुल्काचे डीडी सह (सरकारी सुटट्या सोडून)	२५/११/२०२६ ते २७/११/२०२६ वेळ ४.३० पर्यंत
(*Cut off Date*)	३०/११/२०२६

टिप : (अ) वरिल अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य शासनाने ठरवून दिलेले संवैधानिक आरक्षण लागू राहतील.

(ब) वरिल अभ्यासक्रमातील निवड ही महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या मानकानुसार राहतील.

(क) अर्ज करण्याची पध्दत :-

इच्छुक विद्यार्थ्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर वेबसाईट ***www.gmcnagpur.org*** यावर जावून बीएस्सी-पीएमटी ॲडमिशन या लींक वर क्लीक करावे. या लिंक वर ब्रवेश अर्जाचा नमुना , अर्ज भरण्याबाबतची माहीती, कोर्स फ्रेफरेन्सेस कश्या प्रकारे भरावे, गुणवत्ता यादी तयार करण्याची पध्दती , इ. माहीती दिलेली आहे. प्रवेश अर्जाचे प्रींट काढून सदर अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रे जोडावे. अर्ज व प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांनी/पालकांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जमा करावा. प्रस्तुत जाहीरात प्रवेशाकरीता उपलब्ध जागांचा विषय तसेच संवर्ग निहाय तक्ता, अटी व शर्थी तसेच अर्जाचा नमुना व मेडीकल फीटनेस प्रमाणपत्राचा नमुना या महाविद्यालयाची वेबसाईट ***www.gmcnagpur.org*** वर उपलब्ध आहे.

(इ) सदर अभ्यासक्रमामध्ये प्रवेशाकरीता वेगळे पत्र पाठविण्यात येणार नसल्याने आपणास वेळोवेळी या महाविद्यालयाची ***www.gmcnagpur.org*** ही वेबसाईट वेळोवेळी पाहणे आवश्यक आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर